# राशिभविष्य - एप्रिल, २०१९.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==============================================================

**आपणां सर्वांस नवीन वर्ष विकारी नाम संवत्सर शक १९४१ साठी हार्दिक शुभेच्छा !**

==============================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात सर्वांगीण अनारोग्याची काळजी घेणे अगत्याचे ठरणार आहे. उष्णताविकारांचे आजार त्रस्त करतील. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी मनस्थिती शांत ठेवण्याचा प्रयत्न करावा. मनाचा क्षोभ होणार नाही याची काळजी घ्यावी. आर्थिक चिंता अस्वस्थ करण्याची शक्यता आहे. "देणे द्यावेच लागेल; पण येणे मात्र केव्हा येईल त्याची निश्चिती नाही" अशी बिकट अवस्था काही मंडळींची होणे संभवते. प्रथम स्थानी असलेल्या हर्षलमुळे स्वभाव चंचल, अस्थिर, लहरी, विक्षिप्त असा घडल्यास हातून नको ते घडू शकेल. जपा. या राशीच्या लहान मुलांना पालकांनी विशेष जपावे, असे सांगावेसे वाटते. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना नोकरीत या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. पण केवळ बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होणे संभवते. कुमार्गी मित्रांपासून कटाक्षाने दूर राहा. नपेक्षा त्यांचा सहवास मनस्ताप वाढवणाराच ठरेल. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात बुध - शुक्र अनुकुल असल्याने मधून मधून काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. महिन्याच्या उत्तरार्धात हे दोन्ही ग्रह या राशीच्या व्ययस्थानी गेल्यावर बुध ग्रह प्रतिकुल होईल पण शुक्रामुळे मधून मधून क्षणिक सुखसमाधान मिळेल. हातून कर्तृत्व घडण्यास राहू अनुकुल असला तरी त्याच्यामुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी स्वराशीचा गुरु ग्रह असला तरी तो वक्री असल्यामुळे तो देणार असलेल्या विविध गोष्टीत कमीपणा येणे संभवते. शनि ग्रहामुळे दूरच्या प्रवासाचे योग संभवतात. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे येणे संभवते. केतूमुळे काही मंडळींच्या संततिसुखात बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. व मन:शांती मिळेल. दररोज नियमितपणे स्नान झाल्यावर २१ वेळा " ओम गं गणपतये नमः" मंत्राचा जप करा. तसेच "हनुमानचलीसा" स्तोत्राचे पठण करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. म्हणून जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करा. तरच महिन्याचा उत्तरार्ध अधिक सुखासमाधानाचा जाईल. परंतु बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. स्वतंत्र व्यवसाय करत असणारांना महिन्याच्या पूर्वार्धात अडचणींना तोंड द्यावे लागेल. उत्तरार्ध सुखाचा जाईल. महिन्याचा सर्व आर्थिक व्यवहार विचारपूर्वक व सावधानतेनेच करा. तरच आर्थिक चिंता करावी लागणार नाही. स्वभावदोषावर नियंत्रण ठेवा. उतावळेपणा करू नका. "अरे ला का रे ?" करू नका. हट्टीपणा कराल तर अकारण श्रम व दगदग होईल व त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकाराचा आजार त्रस्त करील. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला शनि ग्रह शारीरिक, मानसिक दृष्ट्या अनारोग्यकारकच होणार आहे. जपा. काही मंडळींना त्वचारोग, काहींना मुखदंत रोग, तर काहींना रक्तविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. म्हणून सतत मनावर, विचारांवर नियंत्रण ठेवून, जिभेला लगाम घालून नम्रतेचे

आचरण करा. तसे आचरण कराल तर खूप सुखाचे निश्चिन्त जीवन जगू शकाल. जीवनसाथीशी समजूतदारपणे आचरण करा. कौटुंबिक जीवनात कलह निर्माण होणार नाहीत याची काळजी घ्या. अशाही परिस्थितीत ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशांपैकी काहींना असा धनलाभ होणे संभवते. काहींना वारसा हक्काने धनलाभ होऊ शकेल. या राशीच्या दशम स्थानी असलेला नेपच्यून मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना अनुकुल व लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे " ओम नम: शिवाय " मंत्राचा एक माळ जप करा. तसेच "शिवलीलामृत" स्तोत्राचे पठण करा.

**(३) मिथुन -** राहू-केतू,मंगळ पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे या राशीच्या मंडळींच्या जीवनात सतत मनस्ताप देणाऱ्या, अपमान होणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. त्यामुळे सूडभावना प्रज्वलित होणे संभवते. जपा. नपेक्षा काही मंडळींना वातविकाराचा आजार तर काहींना उष्णताविकाराचा आजार त्रस्त करील. अशा परिस्थितीत शक्यतो वादविवाद, भांडणे टाळा. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडुन मनस्ताप दिला जाणे संभवते. आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. भाग्य स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. तसेच अध्यात्माची मनापासून ओढ असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. शुक्रामुळे महिन्याच्या पूर्वार्धात मनोनुकूल घटना घडतील; पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर नोकरी-व्यवसायात अडथळे, अडचणी निर्माण करण्याची शक्यता आहे. याउलट बुध ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात मनस्तापकारक होईल; तर उत्तरार्धात कौटुंबिक सुखसमाधान देईल. जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतील वाद, मतभेद आदि कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. तसेच भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी संशयाने किंवा अन्य कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. पण या राशीच्या सप्तम स्थानी शनि सह गुरु असल्याने वकिली, सल्लागारी व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. या स्थानी असलेला गुरु ग्रह वक्री असल्याने व शनिसह असल्याने प्रेमसंबंधात, अर्थलाभात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या हर्षलमुळे सुद्धा मित्रांशी भांडणे होऊन मैत्रीत बाधा येणे संभवते. सर्व अनिश्चित असले तरी या हर्षलमुळे काही भाग्यवंतांना अर्थलाभ होणेही शक्य आहे. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(४) कर्क -** या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. म्हणून त्यांनी महिन्याच्या पूर्वार्धात जे काय साध्य करावयाचे त्याची पूर्व तयारी करून ठेवावी. त्यासाठी बुध - शुक्र अनुकुल होतील. पण महिन्याच्या उत्तरार्धात बुध ग्रह प्रतिकुल होईल व त्यामुळे आपल्या कामात अडथळे , अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. शनि -बुध -केतू हे तिन्ही ग्रह आपल्या कार्यक्षेत्रात सहकार्य करण्यास तयार आहेत. शुक्रामुळे महिन्याच्या पूर्वार्धात ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशांपैकी काहींना अचानक धनलाभ वा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. हा शुक्र ग्रह महिन्याच्या उत्तरार्धातही अनुकुल असून या राशीच्या काही मंडळींना कीर्ती वा प्रसिद्धी मिळणे संभवते. इतरांना सुख, समाधान, सुसंगती, ऐषाराम प्राप्त होईल. पण या शुक्राबरोबर बुधही या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर वाद, भांडणे होणे संभवते. जपा.

तसेच नियोजित कामात अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल , प्रगतिकारक व यशदायक होईल. सामान्य नोकरदार मंडळींना मात्र कष्ट , परिश्रम करूनच अपेक्षित अर्थलाभ मिळविण्याचा प्रयत्न करावा लागेल. लाभस्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे काही भाग्यवान मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. पण काही कारणाने मित्रांशी वाद, भांडण होऊन वितुष्ट येणे संभवते. जपा. या राशीच्या व्यय स्थानी असलेल्या राहूमुळे काही मंडळींना अर्थलाभ होणे संभवते; तर काही भाग्यवंत मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. काहींचे हितशत्रूपासून रक्षण होईल. पण या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती मिळेल. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे"चे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या पंचम स्थानी शनि, वक्री गुरु व केतू असे तीन ग्रह आहेत. केतू गुरु युतीत असल्याने वेदांत, गूढ अभ्यासाची आवड असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. तसेच आध्यात्मिक उपासनेत रस असणारांनाही उपासनेद्वारे मन:शांती लाभेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य असले तरी अनारोग्य, अडचणी, अडथळे येण्याची शक्यता आहे. त्यामुळे इच्छा असूनही जिद्द , चिकाटीने मनापासून अभ्यास करणे जमले तरच प्रगती करणे शक्य होईल. केतूसह शनि असल्यामुळे पोटाचे अनारोग्य त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या नेपच्यून व बुधामुळे पतिपत्नीत वाद, भांडणे होऊन वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. पण त्याच स्थानी असलेल्या शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. महिन्याच्या उत्तरार्धात ;परिस्थिती सुधारेल. रवि ग्रह पूर्णपणे नोकरीव्यवसायात, घरीदारी प्रतिकुल असल्यामुळे मनस्ताप सहन करावा लागेल. प्रतिकारशक्ती कमी झाल्यास होणारे आजार अधिकच त्रस्त करतील. काही मंडळींना मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर तर घरी वडीलधाऱ्या मंडळींचा विरोध व नोकरीचे ठिकाणी वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. त्यामुळे शारीरिक-मानसिक आरोग्य बिघडण्याची शक्यता आहे. जपा. मात्र या राशीच्या काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही तरी करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी तसे काही करू नये. पण व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता असल्यामुळे त्यांनी मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आहे ती नोकरीच मनापासून करावी. त्यातल्या त्यात यांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना व औषध विक्रेत्यांना काळ बरा जाईल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या राहूमुळे मुलांपैकी कोणाच्या तरी अनारोग्यविषयक किंवा आचरणविषयक समस्या त्रस्त करील. तसेच काही मंडळींना नोकरीत अधिकाराचा गैर वापर करून वाममार्ग धन मिळविण्याची तीव्र इच्छा त्रस्त करील; तर काही मंडळींना जुगाराचा नाद लागण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे एक माळ "ओम नम: शिवाय" मंत्राचा जप करा. तसेच "हनुमानचालीसा" स्तोत्राचे पठण करा.

**(६) कन्या -** या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींच्या कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. कोणाशी न पटणे, माता असेल तर तिचे आजारपण, कसली तरी चिंता त्रस्त करील.

नातलगांपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. अशा परिस्थितीत जन्मकुंडलीत योग असेल तर गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने काही मंडळींचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार पूर्ण होतील. विष भय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे खाद्यपदार्थ खाऊ नका. या राशीच्या काही मंडळींना उगीचच आपल्याला काही आजार झाला असल्याची भावना त्रस्त करील. तसेच एखादी काल्पनिक चिंता अस्वस्थ करील. जपा. काही मंडळींना फसवणूक झाल्याचा मनस्ताप सहन करावा लागेल. काही मंडळींकडे उच्च गुणवत्ता असूनही आपले कर्तृत्व सिद्ध करण्यास सुयोग्य संधीच मिळत नाही याचे दु:ख व मनस्ताप सहन करावा लागेल. पण महिन्याच्या पूर्वार्धात बुध ग्रहाच्या अनुकुलतेने काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. महिन्याच्या उत्तरार्धात बुध -शुक्र या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर शुक्राच्या अनुकुलतेने काही मंडळींचे नवे स्नेहसंबंध जुळून येण्याची शक्यता आहे. जीवनसाथीशी सहकार्य केलेत तरच वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणार नाही. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होईल. महिन्याच्या उत्तरार्धात घरीदारी मनासारखे काही न घडणे, मुलांपैकी कोणाच्या आजारपणाची चिंता त्रस्त करणे, हाती घेतलेल्या कामात अडथळे, अपयश येणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. तसेच अपघात भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. वाहन नियंत्रित वेगानेच पण सावधानतेने चालवा. विचाराच्या तंद्रीत रस्त्याने चालू नका. शक्यतो प्रवास करू नका कारण प्रवासात मनस्ताप, मानहानी होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या राहूमुळे काही भाग्यवान मंडळींना एखादे अधिकार पद मिळेल, काहींचा सन्मान होईल तयार काहींना उच्च यश प्राप्त होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे”चे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या शनि -गुरु ग्रहांच्या अनुकुलतेने या राशीच्या काही मंडळींना अपेक्षित असलेली नवी नोकरी किंवा नवे कार्यक्षेत्र मिळू शकेल. या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होऊ शकेल. पण काही मंडळींना एखाद्या भावंडाकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. उलट काही मंडळींना भावंडविषयक चिंता त्रस्त करील. सध्या अति भावनाशील मनस्थिती झाली असल्यास काहींना असह्य मानसिक दु:ख सहन करावे लागण्याची शक्यता दिसते. अध्यात्मात रस असेल तर आध्यात्मिक उपासनेद्वारे मन:शांती लाभेल. गूढ संशोधनात रस असणारांना सध्याचा काळ अनुकुल आहे. सर्व प्रकारच्या कलावंतांना कलेत प्रगती करण्यास काळ अनुकुल होईल. पण महिन्याच्या पूर्वार्धात बौद्धिक कार्यात प्रगती होणे शक्य दिसत नाही. उलट संतती, स्त्रीपासून त्रास होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात याच बुधामुळे कार्यसिद्धी होईल व अर्थलाभ होणेही शक्य आहे. उलट शुक्रामुळे कलाकारांची त्यांच्या कलेत प्रगती झाली असली तरी आपले कलेतील कसब प्रकट करण्यास त्यांना योग्य संधीच मिळणार नाही. तसेच ज्यांची प्रेमप्रकरणे असतील त्यांच्या प्रेमात केवळ कामुकता असल्याने शुद्ध प्रेमभावना नसण्याची शक्यता दिसते. जपा. अशा प्रेमप्रकरणात अपयश आले तर काहीजण व्यसनाधीन होणेही संभवते. काहीजणांवर आळ येणेही संभवते. जपा. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व सुखकारक होईल. रवि ग्रह भाग्योदयकारक आहे. पण ज्यांना हृदयविकाराचा आजार आहे त्यांनी आपल्या भावनांचा क्षोभ होणार नाही याची काळजी घ्यावी. या राशीच्या सप्तम स्थानी हर्षल हा विक्षिप्त स्वभावाचा ग्रह असल्यामुळे जीवनसंगिनीचे लहरी, विक्षिप्त आचरण, पतिपत्नीत होणारे वाद, गैरसमज, भांडणे अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. ज्यांचा भागीदारीत व्यापारव्यवसाय आहे अशा मंडळींनी

संशय किंवा अन्य कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे शारीरिक उष्णता भडकून काही मंडळींना उष्णताविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. काही मंडळींना मूळव्याधीसारखा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. हा मंगळ अपघातकारक असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. वाहन नियंत्रित वेगानेच चालवा. विचाराच्या तंद्रीत रस्त्याने चालू नका. जलभय असल्याने जलप्रवास करू नका किंवा खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. त्याचप्रमाणे विष भय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. भाग्य स्थानी असलेल्या राहूमुळे प्रवासाचे योग येतील. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. श्रद्धा असेल तर कुलदैवताची तसेच हनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे "श्रीहनुमानचालिसा " स्तोत्राचे पठण करा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या कुटुंब स्थानी म्हणजेच धनस्थानी शनि - वक्री गुरु -केतू हे तीन प्रतिकुल ग्रह असल्यामुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता आहे. तसेच आर्थिक संकटे येणे, आर्थिक चिंता वाटणे, कोर्ट प्रकरणे असतील तर त्यांचा मनस्ताप होणे, अशापैकी त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. पण वक्री गुरु काही प्रमाणात अनुकुल होईल व मनोनुकुल घटना घडतील. काही प्रमाणात अर्थलाभ होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळेही गृहसौख्यात थोडी बाधा येणे संभवते. पण बुधामुळे गृहसौख्य जपले जाईल. शिवाय मित्रसुखही मिळेल. ज्यांची शेतीवाडी आहे अशांना शुक्राच्या अनुकुलतेमुळे लाभ होईल. येथील बुध -शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर कोणत्याही कलेची आवड असणारांना त्या कलेच्या छंदापासून आनंद व सुखसमाधान लाभेल. . पण बुधामुळे संतती, स्त्रीपासून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात रवि ग्रह या राशीच्या पंचम स्थानी असताना घरीदारी, नोकरीचे ठिकाणी मनस्तापदायकच होईल; पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर नोकरदार मंडळींना अनुकुल व भाग्योदयकारक होईल. हितशत्रू पराभूत होतील. मन:शांती लाभेल. पण या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला हर्षल ग्रह आरोग्यविघातक होईल व त्यामुळे काही मंडळींना मुदतीचा ताप येणे, काहींना डोकेदुखीचा त्रास होणे तर काहींना मेंदूविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. पण हाच हर्षल ग्रह उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना अनुकुल , प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेला मंगळ जीवनसाथीचे अनारोग्य, पतिपत्नीत होणारे वाद, गैरसमज अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करील जपा. भागीदारीत व्यापार व्यवसाय असणारांनी संशयाने किंवा अन्य काहीही कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काहींना वारसा हक्काने असा धनलाभ होऊ शकेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती मिळेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "ओम गं गणपतये नम: " मंत्राचा २१ वेळा जप करा. तसेच "श्रीहनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात स्वतः:च्या व जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी घेणे अगत्याचे होईल. वाहन चालवत असाल तर सावधानतेने व नियंत्रित वेगानेच चालवा. वाहन अपघात भय संभवते. नियोजित कार्यात अडथळे, अडचणी निर्माण होणे संभवते. कुटुंबातील

सदस्यांपैकी कोणाचे स्थलांतर होण्याची शक्यता दिसते. काही मंडळींना प्रवासाचे योग्य येतील. पण गुरु ग्रहामुळे काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. काही भाग्यवान मंडळींना या गुरूमुळे नोकरीत अधिकार पद मिळण्याची शक्यता आहे. तसेच बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना व या राशीच्या लेखकांना हा गुरु प्रगतिकारक व यशदायक होईल. नेपच्यूनमुळे सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती भावनाशील झाली असावी. तसे असेल तर आध्यात्मिक उपासना मन:शक्ती देईल. गूढ विद्येची आवड असणारांना हा नेपच्यून अनुकुल होईल. तसेच या नेपच्यूनमुळे या राशीच्या काही मंडळींना जलप्रवासाचे किंवा परदेशगमनाचे योग संभवतात. महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या काही मंडळींना मान, प्रतिष्ठा, धनलाभ वा भूमिलाभ होणे संभवते. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. पण बुध ग्रहामुळे हितशत्रूंचा त्रास होणे संभवते. हे बुध -शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर गृहसौख्य, मित्रसुख मिळू शकेल. शेतीवाडी आसणारांना त्यापासून लाभ होईल. पण महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या रवि ग्रहामुळे कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. तसेच अनारोग्याचा त्रास होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या नोकरदार मंडळींना वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेलसे दिसते. जपा. कौटुंबिक जीवनात संततीविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. त्यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील. गुरु-हर्षल शुभ योगामुळे उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल , प्रगतिकारक व यशदायक होईल. तसेच कलावंतांची कलेत प्रगती होईल. काहींना अंतर्ज्ञान प्राप्त होणेही संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे उष्णताविकाराचे, रक्तविकाराचे आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. हृदयविकार असणारांनी मनस्थिती शांत राखावी. . काही मंडळींना अपप्रचाराचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. पण हा मंगळ यांत्रिकतांत्रिक व्यवसाय व औषधविक्रेते यांच्या व्यवसायाला पूरक होईल. राहूमुळे वैवाहिक जीवनातीळ सुखात काहीही कारणाने बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे”चे तसेच “हनुमानचालिसा” स्तोत्राचे पठण करा.

**(१०) मकर -** स्वभाव लहरी, अस्थिर झाल्यामुळे व आर्थिक समस्या त्रस्त करीत असल्यामुळे या राशीच्या मंडळींची मनस्थिती सध्या चिंतामय झाली असण्याची शक्यता दिसते. पण महिन्याच्या पूर्वार्धात धनस्थानी नेपच्यून बरोबर बुध-शुक्र असल्यामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल व आर्थिक चिंता फारशी सतावणार नाही. महिन्याच्या उत्तरार्धात केवळ या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री ग्राहकांकडून अर्थलाभ होईल. काही मंडळींना भूमिलाभ होणे संभवते; तर रवि ग्रहाच्या अनुकुलतेने काही नोकरदार मंडळींना मानाचे , प्रतिष्ठेचे स्थान मिळू शकेल. वरिष्ठ कामाचे कौतुक करतील. . पण बुध ग्रहामुळे हितशत्रूचा त्रास होण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी हर्षलसारखा विक्षिप्त ग्रह असल्याने कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येण्याची शक्यता आहे. शिवाय महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह हर्षल सह असल्यामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य होणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे मुलांपैकी कोणाची आचरणविषयक समस्या तर कोणाचे अनारोग्य अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. या काळात या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. काही मंडळींना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या ज्यांचा अन्य जातिधर्माच्या मंडळींशी व्यावसायिक संबंध आहे त्यांना अशा संबंधामुळे आर्थिक लाभ होणे

संभवते. हितशत्रू पराभूत होतील. पण विषभय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे . खाद्यपदार्थ खाऊ नका. काही मंडळींना पोटाच्या अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. शक्यतो प्रवास करू नका. कारण प्रवासात असह्य मनस्ताप होणे संभवते, सामाजिक कार्य करत असणारांना व आध्यात्मिक उपासना करत असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. पण कौटुंबिक त्रास होणे, अपेक्षाभंग होणेही संभवते. व्यय स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे अनारोग्य, मानहानी, मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. विशेष करून आर्थिक व्यवहार सावधानतेने व विचारपूर्वक करा. काही मंडळींना कोर्ट प्रकरणाचा त्रास सहन करावा लागेल. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहे याची जाणीव ठेवूनच सुयोग्य आचरण करा. श्रद्धा असेल तर श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे “हनुमानचालिसा “ स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. वरिष्ठ कामाचे कौतुक करतील. काही मंडळींना बढती, काहींना एखादे उच्च पद तर काहींना मानाचे स्थान मिळण्याची शक्यता आहे. पण महिन्याच्या पूर्वार्धात कौटुंबिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. काही मंडळींना वाढत्या खर्चाची चिंता त्रस्त करील. काही मंडळींना आर्थिक नुकसान झाल्याचा धक्का बसेल. काहींना कौटुंबिक वाद, भांडणे यांचा त्रास सहन करावा लागेल. काही मंडळींना डोळ्याचे अनारोग्य त्रस्त करील. सध्या या राशीच्या मंडळींची मानसिक स्थिती अत्यंत कोमल झाली असावी असे वाटते .त्यामुळे मानसिक संवेदनाही अति शीघ्र होत असतील. त्याचा परिणाम म्हणून मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहिरे नैराश्य येत असावे. बुधामुळे काहींना कुसंगतीची बाधा होणे संभवते.. जपा. पण शुक्र ग्रह पूर्णपणे अनुकुल असल्याने परिस्थिती अटोक्यात राहील व सर्व प्रकारचे सुखसमाधान लाभेल या राशीच्या तृतीय. स्थानी असलेला हर्षल ग्रह व लाभस्थानी असलेला गुरु ग्रह यांच्यात शुभ योग होत असल्याने या राशीच्या उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे कौटुंबिक जीवनात असमाधानकारक घटना घडण्याची शक्यता आहे. शिवाय गैरसमज, वाद अशापैकी कारणांमुळे असह्य मनस्ताप होणे संभवते. पंचम स्थानी असलेल्या राहूमुळे कमिशन दलालीवर व्यवसाय करत असणारांना काळ लाभदायक होईल. पण हा राहू व लाभस्थानी असलेला शनि संततिसुखात बाधा निर्माण करतील . जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. . पण हा शनि ग्रह वकिली व्यवसाय असणारांना लोखंड, कोळसा यांचा व्यापार असणारांना लाभदायक होईल. लाभस्थानी असलेल्या केतुमुळे सुखसमाधान लाभेलच; पण खूप प्रवासाचे योग येण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “ओम नम: शिवाय “ मंत्राचा एक माळ जप करा. तसेच “हनुमानचालीसा “ स्तोत्राचे पठण करा.

**(१२) मीन -** गुरु -हर्षल या दोन्ही उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यास अनुकुल असणाऱ्या ग्रहांमध्ये शुभ योग असल्याने अशा कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक यशदायक व लाभदायक होईल. वरिष्ठ तुमच्या परिश्रमाचे कौतुक करतील. तसेच या कार्यक्षेत्रातील काही भाग्यवान मंडळींचा मानसन्मान होणेही संभवते. दशम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे काही मंडळींना अपेक्षित असे नवे कार्यक्षेत्र मिळू शकेल.

पण इतर बाबतीत रवि - बुध - हर्षल प्रतिकुल असल्यामुळे मनस्थिती चंचल, अस्थिर होणे, मित्र द्रोह होणे, धननाश होणे, काहींना कुसंगतीचा त्रास होणे संभवते. रवि ग्रह प्रतिकुल असल्याने असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. त्यामुळे शारीरिक अनारोग्य होणे संभवते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी मनाचा क्षोभ होणार नाही याची काळजी घ्यावी. शारीरिक उष्णता भडकून काही मंडळींना डोळ्याचे अनारोग्य त्रस्त करील. काही मंडळींना प्रचंड थकवा येईल. महिन्याच्या उत्तरार्धात आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे.. जपा. अशा परिस्थितीत शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. सध्या हर्षलसारखा विक्षिप्त ग्रह अतिशय अस्थिर वृत्तीचा झाला असल्यामुळे अविचाराने खर्च होणे, तोंडाला येईल तसे फटकळ बोलणे, विचित्र आचरण होणे संभवते. त्यामुळे इच्छा नसतानाही समोरच्या माणसाचा नकळत अपमान होणे संभवते. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी असलेला मंगळ ग्रह अनुकुल असल्याने धैर्य, हिम्मत वाढेल. महत्त्वाकांक्षा वाढेल. हातून कर्तबगारी घडेल. प्रवासयोग येईल. पण सतत सावधानतेने आचरण करणे जरूरीचे होईल. कारण इजा होण्याची दाट शक्यता आहे. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेला राहू कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे.. जपा. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या केतु ग्रहामुळे या राशीच्या काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी तो विचार मनातून काढून टाकावा. आहे तो नोकरी-व्यवसायच मनापासून करावा.

आपली राशी श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची राशी असल्याने श्रद्धा असेल तर दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे” पठण करा.

======ooooo0oooooo======